# प्रकरण १ ले

## प्रास्ताविक


१ अ] समस्येची निवड

१ आ] समस्या विधान

१ इ ] समस्येची गरज व महत्त्व

क] समस्येची गरज

ख] समस्येचे महत्त्व

१ ई] अभ्यासाची उद्दिष्टे

१ उ] संदर्भ साहित्याचे समालोचन

१ ऊ] संशोधनाची पध्दती

१ ए] संशोधनाच्या मर्यादा

१ ऐ] प्रकरणाचे नियोजन

संदर्भ.

# प्रकरण १ ले

## प्रास्ताविक

### १ अ] समस्येची निवड:-

मानवी जीवन व्यवहारात भाषेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. भाषे-शिवाय जीवन निरसवाणे व कंटाळवाणे होईल. भाषेशिवाय मनुष्याचे सर्व व्यवहारच अशक्य होतील.

भारत देशात अनेक गोष्टीमध्ये विविधतादिसून येते. अनेक धर्मांचे जातींचे अनेक पंथाचे लोक भारतात राहतात. शिवाय अनेक भाषा बोलणारे लोक भारतात राहतात. प्रत्येक राज्याची भाषा वेगळी आहे. भारतातील राज्यघटनेत १४ भाषांचा अंतर्भाव आहे. भाषेच्या या अनेक विधतेमुळे राज्या-राज्यामध्ये सीमावादासारखे तंटे घडून येतात.

प्रत्येक राज्याची बोलीभाषा ही सध्या ज्ञानभाषा बनत आहे. राष्ट्रीय एकात्मता साधण्यासाठी राष्ट्रभाषेचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. तरीही ज्ञानार्जना-साठी व व्यवहारकुशलतेसाठी प्रत्येक नागरीकास आपल्या मातृभाषेचा सर्वांगीण विकास होणे आवश्यक आहे. कोठारी आयोगाने मातृभाषेच्या विकासासाठी माध्यमिक शिक्षणात त्रिभाषा सूत्र स्विकारण्याची शिफारस केलीआहे. शिवाय प्रथम भाषा म्हणून मातृभाषेला महत्त्वाचे स्थान दिले आहे.

सर्व क्षेत्रामध्ये भाषेचा वापर आपणालादिसून येतो. भाषेशिवाय जीवन व्यर्थ आहे. विचारांची देवाण-घेवाण, भाव-भावना भाषेशिवाय शक्यच नाही. सर्व गोष्टी उमजण्यासाठी मातृभाषा ही आवश्यक बाब आहे.

शिक्षण क्षेत्रामध्ये निरनिराळे प्रयोग केले जात आहेत. त्यातूनच मातृभाषेच्या विकासाला अतिशय महत्त्व आलेले आहे. नवीन अभ्यासक्रमात इयत्ता बारावी पर्यंत मातृभाषेचा अभ्यास आवश्यक करण्यात आला आहे. भाषेच्या अभ्यासात ज्ञान व आकलनाईतकेच स्वतंत्र लेखनाला, अभिव्यक्तीला आगळेवेगळे असे महत्त्व आहे. भाषेच्या अध्यापनाचे हे एक उद्दिष्ट आहेच.

इयत्ता दहावी पर्यंतच्याअभ्यासक्रमात मातृभाषा ही शिक्षणाची माध्यम भाषा बनली आहे. मातृभाषेतून शिक्षण देणे ही विचाराअंती आवश्यक अशी बाब ठरली आहे. मातृभाषेतून शिक्षण सुकर जाते. तरीही मातृभाषेच्या अभ्यासाकडे विद्यार्थ्यांचे दुर्लक्ष असल्याचे जाणवले याची खंत संशोधकास सतत वाटते. शिवाय विद्यार्थ्यांची सर्वांगीण तयारी होण्याच्या दृष्टीने शालेय तासीका खूप कमी पडतात. संशोधकाने बी.एड्. ला मराठी ही अध्यापनपध्दती निवडली होती. एम.ए.साठी ८०० गुणांचा मराठी विषयाचा अभ्यास केलेला आहे. गेली १५ वर्षे माध्यमिक शाळेत संशोधक मराठी अध्यापनाचे कार्य करीत आहे. तसेच माध्यमिक शालान्त परीक्षेत परीक्षक म्हणून १० वर्षे कार्य केले आहे. या अनुभवातून संशोधकाला असे आढळले की, माध्यमिक शालान्त परीक्षेत मराठी विषयात विद्यार्थ्यांचे पासाचे प्रमाण जास्त असते. तरी पण उत्तीर्ण विद्यार्थ्यांना मराठी विषयात खुपच कमी गुण मिळालेले दिसतात.

या स्थितीमुळे संशोधकाला एक मराठी विषयाचा शिक्षक म्हणून चिंता वाटली. अशा या स्थितीची कोणती कारणे आहेत, ती शोधावी व त्यावर काही उपाय, सूचविता येतात का हे पहावे, यासाठी हे संशोधन हाती घेतले आहे.

## १ आ ] समस्या विधान:-

समस्या विधान खालील प्रमाणे आहे.

"बार्शी तालुक्यातील ग्रामीण विभागामधील माध्यमिक शाळांतील इयत्ता दहावीच्या मराठी अध्यापनाच्या समस्यांचा चिकित्सक अभ्यास".

**" A Critical Study of the Problems of Teaching of Marathi of Tenth Standard in Rural Secondary Schools in Barsi Taluka."**

या संशोधनात खालील गोष्टींचा प्रामुख्याने अभ्यास केलेला आहे.

१] मराठी विषयाच्या शिक्षकांच्या व्यावसायिक तयारीचा अभ्यास.

२] माध्यमिक शाळांमधील मराठी विषयाच्या अध्यापन पध्दतींचा अभ्यास.

३] माध्यमिक शाळांतील मराठी विषयाच्या अध्यापनात विद्यार्थ्यांच्या अभिव्यक्तीसाठी कोणते उपक्रम आयोजित केले जातात याचा अभ्यास.

४] इयत्ता दहावीला मराठी विषयाच्या अध्यापनात कोणकोणत्या शैक्षणिक साधनांचा वापर केला जातो याचा अभ्यास.

५] माध्यमिक शाळांतील मराठी विषयाच्या अध्यापनात शुध्दलेखन सुधारण्यासाठी कोणती उपाययोजना केली जाते याचा अभ्यास.

६] मराठी विषयाच्या महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळाच्या प्रश्नपत्रिकेच्या स्वरूपाचा अभ्यास.

७] माध्यमिक शाळांतील मराठी विषयाच्या अध्यापनामध्ये सुधारणा होण्यासाठी काही उपाय शोधणे.

समस्या विधानातील संबोधाचा अर्थ, संशोधकाच्या मनातील हेतू स्पष्ट करण्यासाठी व संशोधनाची व्याप्ती, मर्यादा स्पष्ट होण्यासाठी दिला आहे.

तालुका- कारभाराच्या सोयीसाठी जिल्हयाचा केलेला एक भाग -१

ग्रामीण विभाग - ज्या ठिकाणी शहरी सुविधा नाहीत. उदा. दळणवळणाची प्रमुख साधने, करमणुकीची साधने वगैरे सुखसोयी नाहीत असे ठिकाण. कारखाने वगैरे उद्योगधंदे नसलेले ठिकाण की जेथे तेथील कारभार ग्रामपंचायत पाहते असे ठिकाण.

शाळा - शिक्षणाचे गृह, स्थान, ठिकाण, शिक्षणाची जागा. माध्यमिक शाळा - इयत्ता ५ वी ते १० वी चे वर्ग ज्या शाळेत आहेत अशा शाळा. इयत्ता १ ली ते ४ थी पर्यंतच्या शाळा हया प्राथमिक शाळा व ११ वी व १२ वी वर्ग कनिष्ठ महाविद्यालयाचे वर्ग किंवा उच्च माध्यमिकचे वर्ग होत. त्यासाठी १ ली ते ४ थी व ११ वी , १२ वी हे वर्ग माध्यमिक शाळांत समाविष्ट होत नाहीत.

मराठी - महाराष्ट्रातील सुप्रचलित भाषा .३ .

अध्यापन - मुलांचा सुयोग्य व अपेक्षित दिशेने विकास व्हावा या हेतूने विशिष्ट प्रकारचे गुणसमृध्द जीवन व विशिष्ट पध्दतींच्या कृती व व्यवसाय यांचा लाभ करून देण्याचा खास प्रयत्न ४.

समस्या - अध्यापन कार्यात निर्माण झालेले प्रश्न व अडचणी.

चिकित्सक - दर्दी, तज्ञ ५

परीक्षा करून, सर्व गोष्टींचा विचार करून, जाणून घेण्याच्या इच्छेने अभ्यास करणे. ६

अभ्यास - व्यासंग ७.

अभ्यास करणे, परिशिलन करणे ८

एखाधा विषयाची उत्तम ओळख . ९

१ इ ] समस्येची - गरज व महत्त्व:-

क] समस्येची - गरज:-

मराठीची सर्वच क्षेत्रात पीछेहाट झालेली आपणाला दिसून येते. गणित, विज्ञान, इंग्रजी या विषयांनाच खूप महत्त्व दिले जाते. मुलांना, शिक्षकांना, पालकांनासुध्दा हेच विषय महत्त्वाचे वाटतात. मराठी आपली मातृभाषा आहे. ती काहीच अवघड नाही असा एक गोड गैरसमज अनेक पालक, शिक्षक व विधार्थी यांचा झालेला आहे.

इयत्ता दहावीच्या निकालानंतर विधार्थ्यांच्या गुणपत्रिकेचे निरीक्षण केल्यास इंग्रजीत ८७ टक्के, गणितात १०० टक्के, विज्ञानामध्ये ९५ टक्के गुण मिळविणारा विधर्थी मराठीत ६० टक्के गुण मिळवित असल्याचे दिसून येते. फार थोडया मुलांना मराठीत ७० ते ८० टक्के गुण पडलेले दिसून येतात. मराठी ही आपली मातृभाषा असूनही एस.एस.सी. बोर्डाचा इयत्ता १० वी च्या मराठी विषयाचा निकाल इंग्रजीपेक्षा विशेष जास्त नसल्याचे आढळते. यावरुन मराठी भाषा आपण समजतो तेवढी सोपी नाही. ती खरोखरच अवघड आहे. क्रमिक पुस्तकातील प्रश्नोत्तरे देखील मुलांना समाधानकारकरित्या लिहिता येत नाहीत. मग निबंध , पत्रलेखन, सारांशलेखन यात तर ते पुष्कळसे असफल झालेले दिसतात.

माध्यमिक शाळेतील विषयकामकाज वाटप करताना देखील व्यवस्थित विचार केला जात नाही. पदवी परीक्षेस मराठी विषय असलेल्या कित्येक शिक्षकास कामाचे तास व्यवस्थित मिळावेत. म्हणूनच मराठी विषय दिला गेल्याचे अनेक शाळांत पाहावयास मिळते.

> " जमेल थोडेसे वाचून, थोडा प्रयत्न केला तरी मराठी शिकविता येते." असा एक विचार अनेक शाळांतून ऐकावयास मिळतो.

मराठीचा अभ्यासक्रम शिकविणे म्हणजे गध व पध वाचून दाखविणे, त्यावर काही प्रश्न विचारणे, एवढया मर्यादिपर्यंतच "शिकविणे" चाललेले असते.
गध-पध लेख शिकविण्यामागील मूलभूत उद्दिष्टांची जाणीवच शिक्षकांना राहिलेली

नसते. नेमलेली पुस्तके नियोजित वेळेत वाचून संपविणे यापलीकडे विशेष लक्ष दिले जात नाही. नवीन अभ्यासक्रमात उद्दिष्टानुवर्ती अध्यापन अनुभवांना महत्त्व आलेले आहे. " विद्यार्थी केंद्रित" अध्यापनाला महत्त्व आलेले आहे. आणि त्या दृष्टीने अध्यापनकार्य चाललेले नसते. अध्यापनातील साचेबंदपणा अजूनही जात नाही. मराठी भाषेत मुलांना एवढे कमी गुण का पडतात. याचा मूलगामी विचार कोणीही करताना दिसत नाही. नवनवीन अध्यापन पध्दतींचा मराठी विषय अध्यापनात शिक्षक वापर करीत नाहीत. शिक्षकामध्ये प्रयोगशील वृत्ती दिसत नाही. गद्य-पद्य धडे शिकविले की काम झाले. शालेय तपासणी अधिकारी देखील किती भाग शिकवून झाला? एवढेच पाहतात. पण तो कसा शिकविला गेला? कसा शिकविला जावा? याबाबतीत चौकशी करीत नाहीत. मार्गदर्शनही केले जात नाही. मराठीही माध्यमाची भाषा आहे. शालेय संस्कार केंद्राचे ते माध्यम आहे. मातृभाषेतूनच संस्कार मनावर होत असतात. म्हणून मराठीच्या अध्यापनास एक आगळे-वेगळे असे महत्त्व आहे.

माध्यमिक स्तरावर शिकत असलेल्या विद्यार्थ्यांच्या गरजा पुढील बाबीशी निगडीत असतात. शारीरिक व मानसिक आरोग्य, भावनिक जीवन, सामाजिक जीवन व नागरिकत्व, भाषा, आर्थिक व सामाजिक जीवन, नैतीक, धार्मिक व सांस्कृतीक जीवन, सौंदर्याभिरुची आणि फुरसतीच्या वेळेचा सदुपयोग या गरजा उराशी बाळगून प्रवेश घेतलेला विद्यार्थी, माध्यमिक शाळेतून बाहेर पडताना, त्या गरजांची पूर्ती त्याच्या बाबतीत कितपत झाली याला फार महत्त्व आहे. म्हणूनच माध्यमिक स्तरावर विविध विषय ठेवलेले असतात. मात्र हे विषय जरूर तेथे व शक्य तेथे समवाय साधून योग्य पध्दतीने शिकविले गेले तरच वरील गरजा पूर्ण होऊ शकतात. यासाठी मराठी विषय शिक्षकांवर विशेष जबाबदारी पडते. यासाठी इतर शिक्षकांचेही सहकार्य आवश्यक ठरते. पण इतर शिक्षकांकडून अपेक्षित सहकार्य मिळत नाही. दैनंदिन अध्यापनात विद्यार्थ्यांच्या उच्चारणाकडे, हस्तलेखनाकडे, त्यांच्या शुध्दतेकडे देखील शिक्षकांचे लक्ष नसते. शुध्द उच्चारणावरच शुध्दलेखन अवलंबून असते. त्यादृष्टीने इतर शिक्षकांचे सहकार्य कसे मिळेल आणि मराठी विषयात सर्व मुलाना भरघोस यश कसे प्राप्त होईल याबाबतीत मराठी विषय शिक्षकांवर खूप मोठी जबाबदारी येऊन पडते.

ख] समस्येचे महत्त्व:-

अभ्यासक्रमामध्ये माध्यमिक स्तरावर मराठी हा विषय आवश्यक असला तरी या विषयाला विशेष मानाचे स्थान नाही. इंग्रजी, गणित, विज्ञानाला जे महत्त्व ते मराठी विषयाला नाही. मराठी ही आपली मातृभाषाअसल्याने तिच्या अध्यापनाच्या बाबतीत शिक्षकांकडून ब-याच वरच्या दर्जाच्या अपेक्षा असल्या पाहिजेत त्यासाठी मराठी विषय शिक्षकाला सतत व्यासंगाची आवड असावयास पाहिजे. अध्यापनकार्यात विविध अध्यापन पध्दतींचा वापर करावयास पाहिजे. उद्दिष्टपूर्तीसाठी फक्त पाठयपुस्तकांच्या अध्यापनापेक्षा अध्ययनपूरक कार्यक्रमांना कसे प्राधान्य द्यावे. कोणकोणते उपक्रम आपण आपल्या कामकाजात उपयोगात आणावेत याचे मार्गदर्शन या संशोधनातून होईल.

मराठी अध्यापकाबरोबर इतर अध्यापकांनी देखील माध्यम भाषा म्हणून मराठीकडे विशेष लक्ष का व कसे धावे याचेही मार्गदर्शन या संशोधनातून होईल. हस्ताक्षर व शुध्दलेखनाबरोबरच सुव्यवस्थित वाक्यरचनेतून अभिव्यक्ती किती परिणामकारक होऊ शकते. आशय अभिव्यक्ती किती महत्त्वाची आहे. याचीही कल्पना या संशोधनातून होईल. तसेच अभ्यासपूरक कार्यक्रमात मराठी अध्यापकास कोणते कसे सहकार्य करावे, त्याची गरज काय आहे, याचीही कल्पना या संशोधनातून होईल. मुख्याध्यापकांनाही मराठी अध्यापनाचे कसे आगळे वेगळे महत्त्व आहे. याचीही जाणीव या संशोधनातून होईल. मराठी विषयाचा अभ्यासक्रम हा फक्त पाठयपुस्तकात बंदीस्त नसून त्याचा मुलांच्या जीवनाशी निगडीत संबंध आहे. याची जाणीव या संशोधनातून होईल. त्यासाठी विविध उपक्रमासाठी सहकार्य व मार्गदर्शनकरण्याची प्रेरणा या संशोधनातून मिळेल. तपासणी अधिकारी देखील ज्या साचेबंद दृष्टीकोणातून मराठी अध्यापन तपासणी करतात त्यांनाही आपला दृष्टीकोण विस्तारीत व व्यापक करण्यास हे संशोधन उपयुक्त ठरेल.

इयत्ता दहावीच्या 'परीक्षेसाठी तयारी' या साचेबंद अनुभवातून मराठी अध्यापन बाहेर पडून, 'जीवनाची तयारी करण्यासाठी मराठी अध्यापन' असे स्वरुप प्राप्त होण्यासाठी या संशोधनाचा खचीत उपयोग होईल. मराठीतील पाठय धडयांचे आकलन व त्यावरील प्रश्नोत्तरे व्यवस्थित देता येणे, या चाकोरितून विद्यार्थी बाहेर पडून आपले लेखन व भाषण कौशल्य स्वतंत्र विचारातून अभिवृध्द करण्यास त्यास या संशोधनातून प्रेरणा मिळेल.

१ ई अभ्यासाची उद्दिष्टे :-

१] माध्यमिक शाळेतील इयत्ता दहावीच्या मराठी अध्यापनाच्या आजच्या समस्यांचा अभ्यास करणे.

अ] मराठी विषय शिक्षकांच्या अध्यापनातील समस्यांचा अभ्यास करणे.

ब] मराठी विषय शिक्षकांच्या तयारीचा अभ्यास करणे.

क] ते वापरत असलेल्या विविध अध्यापन पध्दतींचा अभ्यास करणे.

ड] मराठी अध्यापनासाठी वापरत असलेल्या शैक्षणिक साधनांचा अभ्यास करणे.

इ] मराठी विषयाच्या अभ्यासक्रमाचा अभ्यास करणे.

फ] मराठी विषयाच्या अभ्यासपूरक कार्यक्रमांचा अभ्यास करणे.

ग] मराठी अक्षरलेखनाचा अभ्यास करणे.

ह] मराठी विषयाच्या शुध्दलेखन विषयक अभ्यास करणे.

स] मराठी विषयाच्या महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळाच्या प्रश्नपत्रिकेच्या स्वरुपाचा अभ्यास करणे.

२] मराठी अध्यापनात सुधारणा सुचविणे.

१ उ ] संदर्भ साहित्याचे समालोचन:-

संदर्भ साहित्याचे समालोचन करण्यासाठी अभ्यासकाने खालील शैक्षणिक संशोधन ग्रंथांचा अभ्यास केला.

(I) **Educational Investigations in India Universities (1939-1961) N.C.E. R. T., New-Delhi.**

(II ) The IIIrd Indian year book of Education, Educational Research, N.C.E.R.T., New Delhi.

(III) Educational Research in University of Bombay Dr. (Mrs.) Pratibha Deo (Ed) Department of Education, University of Bombay, 1981.

( IV) A Survey of Research in Education edited by Dr. M.B. Buch, centre of Advanced study in Education, M.S. University, Baroda

(V) Educational Investigations in Universities in Maharashtra( 1939-1970) State Institute of Education Pune-30.

( VI) **Second survey of Research in Education (1972-1978) Dr. M.B. Buch ( Education) : Society for Educational Research and Development, Baroda.**

क] श्री पी.के. डोंगरे [१०]

संशोधनाचा विषय- " मराठी भाषेतील साहाय्यकारी क्रियापदांच्या कार्याचा अभ्यास".

पी.एच.डी. मुंबई विद्यापीठ १९६८.

संशोधनाची उद्दिष्टे:- १] संयुक्त क्रियापदाचे वेगवेगळे भाषिक अर्थ समजावून घेणे.

२] मराठी भाषेतील भाषिक कौशल्ये प्राप्त करणे.

संशोधनाची कार्यपध्दती:- मराठीतील नामांकीत

वाङ्मयप्रकार उदा. कथा, निबंध, कादंब-या, नाटके, लेख, मासिके यातील ३३५६ संयुक्त क्रिया-पदांची उदाहरणे, नमुना म्हणून गोळा केली. काव्यपुस्तकातील उदाहरणांची निवड केली नाही. कारण कवितेतील संयुक्त क्रियापदे सर्वसामान्यपणे उपयोगात आणलेल्या उदाहरणापेक्षा वेगळी असतात. निवड केलेली उदाहरणे प्रादेशीक वैशिष्टे दाखवितात. संयुक्त क्रियापदातील साहाय्यकारी क्रियापदाचे कार्य, सविस्तरपणे खालील मुददयांनी दाखवले आहे.

१] प्रत्येकी ३६५६ वाक्ये स्वतंत्र कागदावर दिली आहेत.

२] पत्रिकेचे साहाय्यकारी क्रियापदानुसार गट केले.

३] प्रत्येक प्रकारची वारंवारिता दर्शविली आहे.

४] १०० पेक्षा जास्त साहाय्यकारी क्रियापदांची कार्याविषयी वारंवारिता पुढील चर्चेसाठी निवडली आहे. अशा प्रकारची ९ साहाय्यकारी क्रियापदे होती. त्यात२२५ पानांचे वाचनसाहित्य होते. त्याचे प्रमाण ३:२ होते. संयुक्त क्रियापदा निश्चित भाषिक अर्थाची तुलना आणि संयुक्त क्रियापदासह भाषिक वाक्यरचना, व संयुक्त क्रियापदा व्यतिरिक्त वाक्यरचना यांच्याशी तुलना केली आहे. आधुनिक मराठी साहित्यातून पुष्कळशी संयुक्त क्रियापदाची उदाहरणे गोळा केली.

निष्कर्ष:- १] संयुक्त क्रियापदामध्ये दोन प्रकारचे भाषिक अर्थ उघड दिसतात.

२] साहाय्यकारी क्रियापदाचे "अ" आणि "ब" च्या संदर्भात वेगवेगळे

भाषिक अर्थ प्रकर्षाने जाणवतात.

३] निरनिराळ्या भाषिक अर्थांच्या बाबतीत साहाय्यकारी क्रियापदाची महत्वाची भूमिका असते.

ख] श्री. टी. टी. सावंत. [११]

संशोधनाचा विषय- "मराठी निबंधलेखनात होणा-या चुका"

पी. एच. डी. मुंबई विद्यापीठ, १९७०.

संशोधनाची उद्दिष्टे- १] निबंधाच्या अध्यापनातील वेगवेगळे दृष्टीकोण.

२] विद्यार्थ्यांच्या निबंध लेखनातील चुकांच्या दुरुस्त्या करणे.

संशोधनाची कार्यपध्दती:- मुंबई महानगरपालिकेच्या २७ शाळांतून २९४८ विद्यार्थ्यांनी ३८७४ निबंध लिहिले. संशोधनासाठी आवश्यक ती माहिती ४७ इतर शाळांतून गोळा करण्यात आली. काही महत्त्वाचे मुद्दे प्रश्नावली, विद्यार्थ्यांनी लिहिलेले निबंध, प्रयोग, निरीक्षण, मुलाखती याव्दारे माहिती गोळा करण्यात आली. ४७ शाळांमधून ७०० शिक्षकांच्या मदतीने हे कार्य झाले.

निष्कर्ष:- १] निबंधलेखनाचा विषय, उद्देश काळ, हयात कालाप्रमाणे बदल झाला. त्यावेळच्या निबंधकारांच्या शैलीचा आणि विषयाचा प्रभाव शिक्षकावर पडला.

२] प्राथमिक ज्ञान हे विज्ञानाशी संबंधीत आहे.

३] मुलांच्या वयानुसार विषयाची आवड निवड अवलंबून होती.

४] १ ते ३ वर्गांच्या मुलांना स्वत:च्या भावनांचा आविष्कार निबंधात करता आला नाही. तर काही ४ थी ते ७ वी च्या मुलांना विस्कळीत प्रमाणात आपले विचार मांडता आले.

५] ५ ते ७ वयाच्या मुलांनी आपल्या आवडी निवडीबद्दल निबंधात भावना व्यक्त केल्या. पण ८ ते १२ वयाच्या मुलात विचाराची खोली निबंधलेखनात दिसून आली नाही.

ग] श्री. एस. सी. लाटकर [१२]

संशोधनाचा विषय:- महाराष्ट्रातील मराठी माध्यमांच्या शाळातील

इयत्ता ७ वी च्या विद्यार्थ्यांच्या मातृभाषेच्या

वाचनाच्या प्राथमिक शब्दांचा चिकित्सक अभ्यास.

पी. एच. डी. पुणे विद्यापीठ १९७९.

संशोधनाची उद्दिष्टे:-

१] मराठी माध्यमाच्या विद्यार्थ्यांनी प्राथमिक शब्दांचा योग्य वापर करणे.

२] त्या शब्दांना प्रति शब्द पुरविणे.

३] शब्दांची मर्यादा ठरविणे आणि त्यांचे वर्गीकरण करणे.

४] शब्दांच्या जातीच्या प्रत्येक शब्दांची ओळख करणे.

५] तोंडी आणि लेखी शब्दांचा फरक जाणणे.

संशोधनाची कार्य पध्दती:-

पुणे जिल्ह्यातील २३ शाळांतील इयत्ता ७ वी तील ५७५ विद्यार्थी समाविष्ट केले. सर्व शब्द विशिष्ट जिल्हास्तरावर वापरले जाणारे होते. सदरचे शब्द क्रमीक पुस्तकातील वापरलेले होते. शब्दासाठी इयत्ता ७ वी पर्यंतची पुस्तके अभ्यासली होती. तसेच किशोर वगैरे सारखी इतर मराठी मासिके अभ्यासली होती. ७५ शब्द त्यातून निवडले होते. आईवडिलांपासून सर्वांनी वापरलेले माहितीचे शब्द उदा. छत्री. माहित असलेला शब्द समूहातून इतर शब्द तयार करणे. अशा शब्दांचा वापर कसा करतात. हे पाहण्यासाठी त्यानी दोन चाचण्या दिल्या. शास्त्र इतिहास, भूगोल नागरिकशास्त्र या विषयाच्या नेमलेल्या क्रमीक पुस्तकातून माहितीचे शब्द घेतले. ही चाचणी ५७५ विद्यार्थ्यांना २३ शाळांतून दिली. त्याचे वर्गीकरण करून ६७८२ एवढे वेगवेगळे शब्द व ३०४६६० या चालू शब्दातून वापरले.

निष्कर्ष:-

१] शेकडा ४७.६३ शब्द क्रमीक पुस्तकातील होते. ते इतर विषयातून शिकलेले होते.

२] त्या शब्दांची वारंवारिता वाढलेली होती.

३] त्यांना प्रतिशब्द फार मोठया प्रमाणातून संस्कृत भाषेतून पुरविले होते.

४] एका पाठयपुस्तकातून शिकलेल्या ३९९९ शब्दांची संख्या व त्यांची पुनरावृत्ती संतुलीत नव्हती. त्यात शेकडा १५.१० शब्द मासीकातून

वापरलेले होते.

५] विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात विशेषणांचा वापर केला.

त] श्री. व्ही. एस. पींगे :- १३

संशोधनाचा विषय:-

मराठी माध्यमाच्या इयत्ता ५ वी च्या मराठी विषयाच्या क्रमीक पुस्तकाचा चिकीत्सक अभ्यास.

पी. एच. डी. औरंगाबाद विद्यापीठ १९७२.

संशोधनाची उद्दिष्टे:- १] मराठी विषयाच्या इयत्ता ५ वी च्या क्रमीक पुस्तकाचे विश्लेषण करणे व ते अभ्यासक्रमातील उद्दिष्टे साध्य करण्याच्या योग्यतेचे आहे का ते पडताळणे.

२] त्याची सुधारीत पुनर्रचना करण्याची गरज आहे का ते पाहणे.

संशोधनाची कार्यपध्दती:- महाराष्ट्रातील इयत्ता ५ वी च्या मराठी विषयाच्या नियोजीत अभ्यासक्रमाची पाहणी करणे. पाहणी करण्यासाठी शिक्षक, पालक, शिक्षण तज्ज्ञ यांची मते प्रश्नावली, मुलाखत यांच्या साहयाने गोळा केली. तयार केलेली प्रश्नावली ५६ शिक्षकांना १६ पालकांना व १० शिक्षण तज्ज्ञांना दिली. मुलाखतीव्दारे काही पुरावे गोळा केले.

निष्कर्ष:- १] सामान्यत: शिक्षणाची उद्दिष्टे मराठी भाषा असणा-या मुलांच्यासाठी या पुस्तकाव्दारे फायदेशीर ठरली.

२] त्यात काही दोष दिसले. काही धड्यांचा अभाव. उदा. धडे कमी असणे. अंधश्रध्देवरील धडे नसणे. पत्रलेखन, निबंध लेखन याचा समावेश नाही.

३] धड्याखालील स्वाध्याय दीर्घोत्तरी आहेत. थोडेच वस्तुनिष्ठ आहेत.

४] उदाहरणे उपयोगी आहेत.

५] पुस्तक बांधणी व छपाई आकर्षक आहे.

१ अ ] संशोधनाची पध्दती:-

प्रस्तुत अभ्यासासाठी अभ्यासकाने पाहाणी पध्दतीचा अवलंब केला आहे. या अभ्यासाचे स्वरुप वर्णनात्मक असे आहे.

अभ्यासकाने संशोधनास आवश्यक माहिती उपलब्ध करण्यासाठी खालील साधनांचा उपयोग केला.

१] शिक्षकांसाठी प्रश्नावली.

२] मुख्याध्यापकांच्या मुलाखती.

३] तज्ञ व तपासणी अधिका-यांच्या मुलाखती.

४] इयत्ता १० वी च्या मराठी विषय शिक्षकांची पाठ निरीक्षणे.

१] प्रश्नावली:- अभ्यासास उपयुक्त माहिती जमा करण्यासाठी बार्शी तालुक्यातील ग्रामीण भागामधील इयत्ता १० वी ला मराठी विषय शिकविणा-या शिक्षकांसाठी प्रश्नावली तयार केली.

प्रश्नावली तयार करताना ती पी.एच.डी., एम्.फील. ना मार्गदर्शन करणा-या ४ प्राध्यापकांना दाखविली. त्यांच्या सूचनांप्रमाणे सुधारणा केली. सुरुवातीला प्रश्नावली ३ शिक्षकांना देऊन त्यात कोणत्या उणीवा राहतात का याची खात्री केली. मग प्रश्नावली सुधारुन ती निश्चित केली.

बार्शी तालुक्यामध्ये ग्रामीण विभागात २७ माध्यमिक शाळा आहेत. त्या शाळामध्ये इयत्ता १० वी ला मराठी विषय शिकविणारे ४५ शिक्षक आहेत. त्या सर्वांना प्रश्नावली दिल्या. १० शाळामधून संशोधकाने प्रत्यक्ष जाऊन शिक्षकांची भेट घेऊन त्याना प्रश्नावली देऊन त्या भरुन देण्याविषयी विनंती केली. ३५ शिक्षकांना पोष्टाने प्रश्नावली पाठविल्या.

ही प्रश्नावली परिशिष्ट १ मध्ये दिली आहे.
या प्रश्नावलीतील प्रश्नांचे एकूण १२ विभाग होतात.

कोष्टक क्रमांक: १.१ पुढील पानावर.

## कोष्टक क्रमांक १.१

## प्रश्नावलीचे विभाग

| क्रमांक | प्रश्नांची माहिती | प्रश्नवलीतील प्रश्न क्रमांक |
|---|---|---|
| १ | शिक्षकाविषयी सामान्य माहिती | १ ते ६ |
| २ | शिक्षकांच्या व्यावसायीक तयारी विषयी माहिती | ७ ते १५ |
| ३ | मराठी विषयाच्या अध्यापनाच्या उद्दिष्टांविषयी माहिती. | १६ ते २० |
| ४ | मराठीच्या लेखनकार्य उद्दिष्टांविषयी माहिती | २१ ते३१ |
| ५ | इयत्ता १० वी च्या क्रमीक पुस्तकातील गद्य-पद्य पाठांच्या उद्दिष्टांविषयी माहिती. | ३२ ते ४० |
| ६ | मराठी विषयाच्या अध्यापन पध्दतीविषयी माहिती | ४१ ते ४२ |
| ७ | मराठी व्याकरण अध्यापनाच्या उद्दिष्टांच्या साध्यते विषयी माहिती. | ४३ ते ४४ |
| ८ | मराठी गद्य-पद्य उता-यांच्या आकलनाविषयी माहिती | ४५ ते ५० |
| ९ | अध्यापन साहित्याविषयी माहिती | ५१ ते ५२ |
| १० | अभ्यासपूरक उपक्रमाविषयी माहिती | ५३ ते ६१ |
| ११ | मूल्यमापनाविषयी माहिती | ६२ ते ६४ |
| १२ | शालान्त परीक्षेच्या मराठी विषयाच्या प्रश्नपत्रिकेच्या स्वरूपाविषयी माहिती. | ६५ ते ६७ |

अभ्यासकाने ४५ प्रश्नावल्या बार्शी तालुक्यातील ग्रामीण माध्यमिक शाळांतील इयत्ता १० वी च्या मराठी विषय शिक्षकांना पाठविल्या. २ महिन्यामध्ये १५ प्रश्नावल्या भरून आल्या. राहिलेल्या प्रश्नावल्या मिळविण्यासाठी अभ्यासकाने मराठी शिक्षकांच्या प्रत्यक्ष गाठी घेतल्या. २० शिक्षकांना स्मरणपत्रे पाठवून प्रश्नावली भरून देण्याबाबत विनंती केली. ३ महिन्यानंतर ४० शिक्षकांकडून प्रश्नावल्या भरून प्राप्त झाल्या. ४० प्रश्नावल्यांचे पृथक्करण कोष्टकांत केलेले आहे.

११ आलेख काढलेले आहेत. मिळालेल्या माहितीचे पृथक्करण करून योग्य ते अर्थनिर्वचन केले.

२] मुलाखती:- प्रश्नावलीतून मिळालेल्या माहितीची सत्यता पडताळून पाहण्यासाठी, प्रश्नावली मधून न मिळालेली माहिती मिळावी म्हणून व अधिक माहिती मिळविण्यासाठी संशोधकाने १० मुख्याध्यापकांच्या मुलाखती घेतल्या. मुख्याध्यापकांच्या अनुभवाचा फायदा संशोधकास ह्या मुलाखतीमधून मिळणार होता.

बार्शी तालुक्यातील वेगवेगळ्या विभागामधील प्रतिनिधी म्हणून १० मुख्याध्यापकांच्या मुलाखती घेतल्या. बार्शी तालुक्याचे विभागनिहाय भाग पाडून प्रत्येक विभागाचे प्रतिनिधित्व करतील असे मुख्याध्यापक निवडले. [ मुख्याध्यापकांच्या नावाची यादी परिशिष्ट क्रमांक ४ मध्ये दिलेली आहे. ] मुलाखत घेण्यापूर्वी मुख्याध्यापकांना मुलाखतीत विचारल्या जाणा-या प्रश्नांची सूची १ आठवडा अगोदर वाचण्यास दिली. मुख्याध्यापकांची निवड तालुक्यातील विभागनिहाय कोष्टक क्र. १.२ मध्ये दर्शविल्या प्रमाणे केली होती.

३] शिक्षण तज्ञ व शाळा तपासणी अधिका-यांच्या मुलाखती:- त्याचप्रमाणे ४ शिक्षणतज्ञ व ४ शाळा तपासणी अधिका-यांच्या मुलाखती घेण्यासाठी त्यांना मुलाखतीपूर्वी १ आठवडा अगोदर प्रश्नसूची वाचण्यास दिली. शिक्षण तज्ञांची नावे परिशिष्ट क्रमांक ६ मध्ये व शाळा तपासणी अधिका-यांची नावे परिशिष्ट क्रमांक ८ मध्ये दिलेली आहेत.

४] पाठ निरीक्षणे:- अभ्यासकाने २० शिक्षकांची पाठ निरीक्षणे केली. बार्शी तालुक्यातील विभागनिहाय १० शाळांना प्रत्यक्ष भेटी दिल्या. तसेच विभाग-निहाय शाळामधील २० शिक्षकांची पाठ निरीक्षणे केली. ५ वर्षापेक्षा जास्त, अध्यापनाचा अनुभव असलेल्या ४ शिक्षकांची, ४ वर्षे अध्यापन अनुभव असलेल्या ६ शिक्षकांची , ३ वर्षे अध्यापन अनुभव असलेल्या ४ शिक्षकांची , २ वर्षे अध्यापन अनुभव असलेल्या ४ शिक्षकांची व १ वर्षे अध्यापन असलेल्या ३ शिक्षकांची पाठ निरीक्षणे अभ्यासकाने केली.

[ सदर शिक्षकांची यादी परिशिष्ट क्रमांक १० मध्ये दिलेली आहे. ]

शाळांची प्रत्यक्ष पाहाणी करून अभ्यासकाने निरीक्षण केले. त्यातून मराठी विषयाची मंडळे आहेत का? ते कोणते उपक्रम घेतात? मराठी विषयासाठी स्वतंत्र ग्रंथालय आहे का? शैक्षणिक साधने कोणती आहेत? शाळांच्या इमरती योग्य

सुखसोयीनीयुक्त अशा आहेत का? मराठी विषयाचे १० वी ला किती निबंध घेतात? हे पाहण्यासाठी अभ्यासकाने बार्शी तालुक्यातील विभागनिहाय १० शाळा निवडून त्यांना प्रत्यक्ष भेटी दिल्या. प्रत्यक्ष भेटी दिलेल्या शाळांची यादी परिशिष्ट क्रमांक ९ मध्ये दिली आहे.

उपरोक्त पाठनिरीक्षणासाठी शिक्षकांची आणि मुख्याध्यापकांच्या मुलाखती व शाळाना भेटी दिल्या त्याची निवड खालील कोष्टक क्रमांक १.२ मध्ये दर्शविल्या प्रमाणे केलेली होती.

कोष्टक क्रमांक १.२

अधिक माहिती मिळविण्यासाठी शाळांची निवड

| अ. नं. | विभाग | मुख्याध्यापक मुलाखत | शिक्षक पाठ निरीक्षण | शाळांना भेटी |
|---|---|---|---|---|
| १ | वैराग भाग | ३ | ६ | २ |
| २ | पांगरी भाग | ३ | ५ | ३ |
| ३ | पिंपरी भाग | १ | ४ | २ |
| ४ | कारेगाव भाग | ३ | ५ | ३ |
| | एकूण- | १० | २० | १० |

संशोधनासाठी आवश्यक ती माहिती मिळविण्यासाठी खालील ग्रंथालयातून संदर्भ पुस्तके उपलब्ध केली होती.

१] ग्रंथालय - शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी.

२] ग्रंथालय - शिवाजी महाविद्यालय, बार्शी.

३] ग्रंथालय - बी.पी. सुलाखे कॉमर्स कॉलेज, बार्शी.

४] ग्रंथालय - श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालय, बार्शी.

५] ग्रंथालय - महात्मा गांधी विद्यालय, काटेगाव.

६] ग्रंथालय - सोशल असोशिएशनचे बी.एड्. कॉलेज, सोलापूर.

१ ए ] संशोधनाच्या मर्यादा:-

बार्शी तालुक्यातील ग्रामीण विभागामधील माध्यमिक शाळांपुरतेच हे संशोधन मर्यादित आहे. ग्रामीण भागात २७ माध्यमिक शाळा येतात. बार्शी हे शहरी भाग असल्याने बार्शीतील माध्यमिक शाळांचा विचार केलेला नाही.

माध्यमिक शाळेतील इयत्ता १० वी ला शिकविल्या जाणा-या मराठी विषयापुरतेच हे संशोधन मर्यादित आहे.

१ ऐ ] प्रकरणाचे नियोजन :-

प्रकरण १ ले प्रास्ताविक:- पहिल्या प्रकरणात समस्येची निवड, समस्या विधान, समस्येची गरज व महत्त्व, अभ्यासाची उद्दिष्टे, संदर्भ साहित्याचे समालोचन , संशोधनाची पध्दती, संशोधनाच्या मर्यादा व प्रकरणाचे नियोजन इत्यादी माहिती दिली आहे.

प्रकरण - २ रे :- मराठी विषयाचे माध्यमिक शाळेतील स्थान व महत्त्व

हया प्रकरणात मराठी विषयाचे माध्यमिक शाळेतील स्थान व महत्त्व याचा अभ्यास पुढील मुददयांना अनुसरुन केलेला आहे. मराठी भाषा अर्थ, व्याप्ती आणि अभ्यासक्रमातील स्थान यात मराठी भाषेचा अर्थ सांगून मराठी भाषेचा इतिहास, मराठीच्या पोटभाषा व बोलीभाषा, मराठी भाषेचे लेखन, मराठी भाषेचा शब्दसंग्रह या मुददयावरुन मराठी भाषेची व्याप्ती स्पष्ट केली आहे. मराठी भाषेचे महत्त्व, मराठी विषयाचा माध्यमिक शाळेतील अध्यापनाचा अर्थ व स्वरुप, मराठी विषयाचे माध्यमिक शाळेतील शिक्षण या मुददयावरुन मराठी भाषेचे माध्यमिक शाळेतील स्थान स्पष्ट केले आहे व मराठी विषयाच्या अध्ययनाची तत्त्वे विशद केली आहेत.

माध्यमिक शाळेतील मराठी विषय अध्यापनाची भाषिक उद्दिष्टे व वाङ्मयीन उद्दिष्टे स्पष्ट केलेली आहेत.

प्रकरण ३ रे - वाङ्.मय प्रकारानुसार अध्यापनपध्दती व मातृभाषेचा शिक्षक -

ह्या प्रकरणात वाङ्.मयप्रकारानुसार अध्यापनाबाबत सविस्तर विवेचन केलेले आहे. त्यात वैचारिक गद्याचे अध्यापन, काव्याचे अध्यापन, ललीत वाङ्.मयाचे अध्यापन, कथावाङ्.मयाचे अध्यापन, नाटकाचे, व्याकरणाचे अध्यापन, लेखन विकासासाठी अध्यापन, सृजनशीलतेच्या विकासासाठी अध्यापन व अभ्यासानुवर्ती उपक्रमांचे सविस्तर विवेचन केले आहे. त्याच प्रमाणे मातृभाषेचा शिक्षक आणि मराठी अध्यापनाची तंत्रे याबाबतही माहिती दिलेली आहे.

प्रकरण ४ थे : - माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन -

या प्रकरणात प्रश्नावलीव्दारे शिक्षकाकडून मिळविलेल्या माहितीचे, मुख्याध्यापक, शिक्षणतज्ज्ञ व शाळा तपासणी अधिकारी यांच्या मुलाखतीतून मिळविलेल्या माहितीचे व शिक्षकांच्या पाठनिरीक्षणातून मिळविलेल्या माहितीचे विश्लेषण करुन अर्थनिर्वचन केले आहे.

प्रकरण ५ वे - निष्कर्ष व शिफारशी :-

पाठीमागील प्रकरणात केलेल्या माहितीच्या विशदीकरणाच्या साहाय्याने निष्कर्ष, शिफारशी व पुढील संशोधनासाठीचे विषय या प्रकरणात दिले आहेत.

## संदर्भ


१] कृ. पां. कुलकर्णी : मराठी व्युत्पत्तिकोश
पुणे, श्री लेखनवाचन भांडार,
ग. ल. ठोकळ प्रकाशन,
१९६४, पृष्ठ क्रमांक ४०७.

२] कृ. पां. कुलकर्णी : तत्रैव
पृष्ठ क्रमांक ७१९.

३] प्र. न. जोशी : आदर्श मराठी शब्दकोश भाग १
पुणे, विदर्भ मराठवाडा बुक कंपनी,
१९६९, पृष्ठ क्रमांक १२४.

४] म. बा. कुंडले : शैक्षणिक तत्त्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र.
पुणे, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळे,
श्री विद्या प्रकाशन, १९७९,
पृष्ठ क्रमांक ३४२.

५] श्री. ना. बनहट्टी व भाऊ धर्माधिकारी : सुगम मराठी शब्दकोश
पुणे, सुविचार प्रकाशन मंडळ,
१९६८, पृष्ठ क्रमांक १६६.

६] प्र. न. जोशी : आदर्श मराठी शब्दकोश भाग २
पुणे, विदर्भ मराठवाडा बुक कंपनी,
१९६९, पृष्ठ क्रमांक ३९.

७] प्र. न. जोशी : आदर्श मराठी शब्दकोश भाग १
उपरिनिर्दिष्ट,
पृष्ठ क्रमांक २२.

८] कृ. पां. कुलकर्णी : मराठी व्युत्पत्तिकोश
उपरिनिर्दिष्ट.
पृष्ठ क्रमांक ३८.

९] श्री ना. बनहट्टी व भाऊ धर्माधिकारी : सुगम मराठी शब्दकोश उपरिनिर्दिष्ट, पृष्ठ क्रमांक २४.

10) P.K. Dongare : Cited by M.B. Buch A Survey of Research in Education Baroda. Centere of Advanced Study in Education. Faculty of Education in Psychology-. M.S. University, 1974. Page.278.

11) T.T. Savant : Cited by M.B. Buch, Ibid, Page 298.

12) S.C. Latkar : Cited by M.B. Buch, Third Survey of Research in Education, Baroda, Society for Educational Research and Development, 1978-1983. Page- 595.

13) V.S. Pinge : Cited by M.B. Buch, Ibid, Page 605.